प्रेसनोट                                                            दिनांक ०९/०२/२०२२

लोकसेवक श्री. गणेश दशरथ ठाकरे, वय. ५७ वर्षे, व्यवसाय– वरीष्ठ विभागीय लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता (मध्य) मुंबई विभाग, सार्वजनिक बांधकाम, वरळी (वर्ग–१) यांना लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने ताब्यात घेतलेबाबत.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| गुन्हा नोंद क्र | --- |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम ( संशोधन २०१८) सन १९८८ चे कलम ७ |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लोकसेवक श्री. गणेश दशरथ ठाकरे, वय. ५७ वर्षे, व्यवसाय– वरीष्ठ विभागीय लेखाधिकारी, कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विभाग, सार्वजनिक बांधकाम, वरळी मुंबई (वर्ग–१) |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | तक्रारीमध्ये ४०,०००/– रूपयाची मागणी परंतु पडताळणी च्यावेळी तक्रारदार यांच्या दुसऱ्या एका कामाकरीता १५०००/– रूपयाची मागणी |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | १५०००/– रूपये |
| थोडकयात हकीकत | यातील तक्रारदार यांनी त्यांचे नागपाडा पोलीस रूग्णालय येथील डायलेसिस सेंटरच्या बांधकामाचे क्लोज ३८ अन्वये अतिरिक्त बाबींचा प्रस्ताव सादर केला असता सदर कामासाठी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ४०,०००/– रूपयाची मागणी केली असलेबाबत लेखी तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/१२/२०२१ रोजी पडताळणी केला असता. नमुद पडताळणी कारवाईच्या वेळी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे क्लोज ३८ चे नंतर बघू असे सांगितल्याने तक्रारदार यांनी त्यांच्या सोसायटीच्या टेंडरबाबत चर्चा केली असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे ते काम करून देणेकरीता १५,०००/–रूपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज दि. ०९/०२/२०२२ रोजी अॅसीबी ठाणे युनिटने कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विभाग, सार्वजनिक बांधकाम, वरळी मुंबई येथे सापळा आजमाविला असता आलोसे गणेश दशरथ ठाकरे यांना तक्रारदार यांचेकडुन १५,०००/– रुपयाची लाचेची रक्कम स्विकारल्याने रंगेहाथ पकडण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी** – मा. श्री. डॉ. पंजाबराव उगले सो. पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परीक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा

संपर्क पत्ता :– ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम ४०० ६०१
संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई–मेल :– spacbthane@ mahapolice.gov.in
अॅप्लीकेशन :– acbmaharashtra.net
टोल फ्री नं. :– १०६४
दूरध्वनी क्र. :– ०२२–२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस अॅप क्र. :– ९९३०९९७७००

(माधवी राजेकुंभार)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे.